# बीड जिल्ह्यात अवैधरित्या दारू विक्रीचा सुळसुळाट, दारू विक्रेत्यांना पोलिस प्रशासनाचे पाठबळ?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




## दारूसह अनेक अवैध धंद्यांना आळा घालण्याऐवजी उलट चालना देणाऱ्या बीट अंमलदारांवर कारवाई करण्याची मागणी?


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २३२ ■ रविवार दि.११ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 232 ■ Sunday Dt.11 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# अवैध दारु विक्रीचा धंदा पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने मोठ्या धुमधडाक्यात सुरु?



## जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील गावोगावी गल्लीबोळात अवैध देशी-विदेशी दारू विक्रीची दुकाने थाटली?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शहरांसह तालुक्यातील ग्रामीण भागातील अगदी गल्ली, बोळात अवैध दारु विक्रीचा व्यवसाय खुलेआम सुरु असल्याचे चित्र दिसत आहे. अवैध दारू विक्रीसह गुटका, मटका, ताडी, जुगार आदी धंदेही जामाने फोफावल्याने सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. अवैध करणाऱ्यांशी काही पोलिस अधिकार्यासह कर्मचार्यांच्या अर्थपूर्ण संबधांमुळे बीड जिल्ह्यात पोलिस प्रशासनाचे याप्रकारांकडे दुर्लक्ष होत आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांना अंधारात ठेवून काही पोलीस कर्मचारी याकडे दुर्लक्ष करत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पदभार स्वीकारल्यापासून जिल्ह्यातील अनेक अवैध धंदे मोडीत काढले आहेत. आणि हे धंदे बंद करण्यात त्यांना मोठे यश आले. महत्त्वाचे म्हणजे जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रमुखांना अवैध धंदे बंद करण्यासाठी कडक कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु त्या आदेशाचे पालन जिल्ह्यातील अनेक ठाणे प्रमुख करत नाहीत. यामुळे पोलीस अधीक्षकांनी स्वतः कारवाई करावी, अशी मागणी जणसामान्यांमधून होत आहे.



### संगनमत नेमकं कुणाचे?

बीड जिल्ह्यात अवैध दारु विक्रीसह मटका, गुटका व वाळू माफियासोबत पोलिस अधिकार्यासह कर्मचाऱ्यांचे मैत्रीपूर्ण संबंध सर्वसामान्य नागरिकांना खटकत आहेत. अवैध दारू विक्रीसह अनेक अवैध धंद्यांना आळा घालण्याऐवजी उलट चालना देणारा पोलीस प्रशासनातील यामागचा नेमकं मुख्य सूत्रधार कोण? कुणा- कुणाचे संगनमत आहे, असा संशय नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे.

शहरासह ग्रामीण भागातील गावोगावी विषारी हातभट्टी दारू विक्री सुरू आहे. त्याचबरोबर शिंदी विक्री व विना परवाना देशी-विदेशी दारू विक्रीही जोमात चालू आहे. या विषारी हातभट्टी दारूमुळे अनेकजण मरण पावले आहेत. तर अनेकजण मरणाच्या दारावर आहेत. अनेकांचे दारूमुळे संसार उद्धस्त झाले आहेत. या अवैध दारू विक्रेत्यांवर पोलिसांकडून किरकोळ कारवाई केली जाते, तर या पकडलेल्या किती दारू विक्रेत्यांवर कुठे गुन्हे दाखल होतात. हा संशोधनाचा विषय आहे. पोलिसांनी दारू विक्री करणार्यांना पकडतात. त्यांच्याकडून हजार रुपयांपासून दहा हजार रुपयांपर्यंत रोख रक्कम घेऊन त्यांना त्याच ठिकाणी सोडून देतात. ही अवैध हातभट्टी

▶ पान २ वर

**■ पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना अंधारात ठेवून, दारू विक्रेत्यांकडून बीट अंमलदारांची जोरदार वसूली?**

**■ अवैध दारू विक्रीमुळे सर्वसामान्यांचे संसार उद्धस्त तर अनेकजण मरणही पावले?**


**■ अवैध दारू विक्री करणाऱ्यांसह पोलिसांच्या मोबाईल संभाषणाची चौकशी करणे गरजेचे?**

## गेवराई तहसीलदारांच्या बेकायदेशीर आदेशाविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

### तहसीलदारांच्या मनमानी कारवाईमुळे गेवराई तालुक्यातील नागरिकांमध्ये असंतोष पसरला?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तहसील कार्यालयाने १,१६५ जन्म व मृत्यू प्रमाणपत्र अर्ज कोणतेही वैध कारण न देता रद्द केल्याच्या बेकायदेशीर आदेशाविरुद्ध सय्यद एजाज



इफ्तेखार अहमद यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. हा आदेश मनमानी आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारा असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

सय्यद एजाज यांनी तक्रारीत म्हटले आहे की, गेवराई तालुक्यातील १,१६५ अर्जदारांनी जन्म व मृत्यू प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर केले होते. आधार कार्ड, रेशन कार्ड, ७/१२ उतारा, पीटीआर यांसारख्या कागदपत्रांसह सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्या होत्या. तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी पंचनामा केला, तसेच नगरपरिषद व ग्रामपंचायतींमध्ये १५ दिवसांच्या जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्या. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अर्जदारांना प्रमाणपत्रेही जारी झाली होती. मात्र, २४ एप्रिल २०२५ रोजी तहसीलदारांनी कोणतेही लेखी कारण न देता व सुनावणीची संधी न देता सर्व अर्ज रद्द केले. तक्रारीत जन्म व मृत्यू नोंदणी कायदा, १९६९ च्या कलम १३ (३) आणि १७ चा भंग झाल्याचे नमूद आहे. कायद्यानुसार, नोंदणी रद्द करण्यापूर्वी अर्जदारांना कारण आणि सुनावणीची संधी देणे बंधनकारक आहे, जे तहसीलदारांनी पाळले नाही. यामुळे घटनेच्या कलम १४ (कायद्यासमोर समानता) आणि कलम २१ (जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्य) चे उल्लंघन झाल्याचा दावा तक्रारकर्त्यांनी केला आहे. तसेच, नैसर्गिक न्याय तत्त्वांचा भंग आणि अर्जदारांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागल्याचेही म्हटले आहे.

सय्यद एजाज यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे चार मागण्या केल्या आहेत: १) तहसीलदारांचा आदेश रद्द करावा, २) सर्व अर्जदारांना प्रमाणपत्रे पुनर्स्थापित करावीत, ३) तहसीलदारांच्या कारवाईची चौकशी करावी, आणि ४) अर्जदारांना नुकसानभरपाई द्यावी. तक्रारीसोबत तहसीलदारांचा आदेश आणि जाहिर सूचनेची प्रत जोडली आहे. जिल्हाधिकारी या गंभीर प्रकरणाची त्वरित दखल घेतील, अशी अपेक्षा अर्जदारांनी व्यक्त केली आहे. तहसीलदारांच्या या कथित मनमानी कारवाईमुळे गेवराई तालुक्यातील नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे.

## युध्दाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे परळी स्थानकावर मॉक ड्रील

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

पहलगाम अतिरेकी हल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबत छेडलेल्या युध्दाच्या पार्श्वभूमीवर परळी वैजनाथ रेल्वे स्टेशनवर अनेक विभागांच्या वतीने मॉक ड्रील (अनुभव सराव) करण्यात आला.

गुरुवार सकाळी परळी रेल्वे स्थानकात रेल्वे सुरक्षा बल, सरकारी रेल्वे पोलीस (जीआरपी), अग्निशमन विभाग परळी वैजनाथ

▶ पान २ वर




## पेठ बीड पोलीसांची मटका जुगार खेळणाऱ्यावर छापा

### पोलिसांच्या कारवाईत ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

आज दि.१० मे रोजी पेठ बीड पोलीस ठाणे चे पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज यांना माहिती मिळाली की, कडबा मंडी, पेठ बीड हद्दीत काही ईसम कल्याण मटका नावाचा जुगार खेळत आहेत, अशी माहीती

▶ पान २ वर



## परळी व अंबाजोगाई भागात दहशत निर्माण करुन धुमाकुळ घालणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीवर मकोका

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबादित राखण्यासाठी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुन्हेगारीचे व गुंडगिरीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चउजउ- व चझऊ- व कलम ५५,५६,५७ मपोका अन्वये बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचा धडाका बीड जिल्हाचे पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली बीड पोलीसांनी सुरु ठेवला आहे. जनतेच्या जिविताचे व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी जिल्हयात चोऱ्या, दरोडे, घरफोड्या, खुन,



खुनाचा प्रयत्न, दरोडयाची तयारी, बलात्कार, जुलुमाने घेणे, पळवून नेणे, खंडणी मागणे या व अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द ठोस कारवाई करण्यासाठी बीड जिल्हयातील पोलीस जिल्हयातील व जिल्हाचे बाहेरील गुन्हेगारांवर करडी नजर ठेऊन आहेत. दिनांक ०१/०३/२०२५ रोजी मा. न्यायालयाचे आदेशान्वये पो.स्टे. परळी शहर गुरनं ४४/२०२५ कलम ३०७, ३२६, ३९२, ३९४, ३२३, ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयातील फिर्यादी नामे सहदेव वाल्मीक सातभाई वय २८ वर्षे व्यवसाय शेती रा. तडोळी ता. परळी जि. बीड हे दिनांक १८/१०/२०२३ रोजी दुपारी ०४.३० वाजता

▶ पान २ वर

## विजेच्या कडकडाटासह लातूरमध्ये अवकाळी पावसाची तुफान बॅटिंग

लातूर । प्रतिनिधी

लातूर शहरात अवकाळी पावसाची हजेरी लावली आहे. शहरात जोरधारांनी रस्त्यावर पाणीच पाणी झाले आहे. राज्यात कुठं उन्हाचा चटका जाणवत आहे. कुठे अवकाळी पावसाचा जोर पाहायला मिळत आहे. दरम्यान, या बदलत्या वातावरणाचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. आज सकाळपासूनच लातूर शहर आणि परिसरात ढगाळ वातावरण होतं. उकाडा वाढला होता. दुपारी दोन वाजता वारे सुरू झाले होते.

त्यानंतर तीन च्य सुमाराला जोरदार पावसाळा सुरुवात झाली आहे. विजेचा गडगडाट वाढला तसा पावसाचा जोर वाढत होता. अर्धा तासापेक्षा अधिक काळ पावसाने तुफान बॅटिंग केली आहे. या पावसामुळे केशर आंब्याचा बागेला मोठा फटका बसला आहे. यापूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे केशर आंब्याचा बागेला मोठ्या प्रमाणावर नुकसानचा सामना करावा लागला होता. आता ह्या पावसाने उरलेला बागेला ही फटका बसला आहे. शहरासह इतर भागात देखील मुसळधार पाऊस पडत असल्याचे पाहायला मिळत आहे. विजेच्या कडकडासह जोरदार पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची देखील चांगली तारांबळ उडालाच पाहायला मिळत आहे.

# वादळ आलं तरी, १०० वर्षे कुठल्याही वातावरणात हा पुतळा टिकेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती, सिंधुदुर्गात नवा पुतळा

सिंधुदुर्ग । प्रतिनिधी

मालवण किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली होती. त्यानंतर, राज्यभरातून शिवभक्तांनी संताप व्यक्त केला. संतापाची लाट पाहून सरकारने लवकरच पहिल्यापेक्षा उत्तम आणि दिमाखदार पुतळा उभारण्यात येईल, असे म्हटले होते. त्यानुसार, आज सिंधुदुर्गातील मालवण किल्ल्यावर छत्रपतींचा नवा पुतळा दिमाखात उभा राहिला आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाममंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुतळ्याचे अनावरण झाले. सुतार साहेबांनी उत्तम पुतळा तयार केलाय. जर वादळं आली, त्या इन्टेन्सिटीचा अभ्यास करत हा पुतळा उभा करण्यात आला आहे. किमान १०० वर्षे कुठल्याही वातावरणात हा पुतळा टिकेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुतळा अनावरण सोहळ्यानंतर बोलताना दिली.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण होत आहे, ही आमच्यासाठी समाधानाची बाब असून त्याच तेजाने आणि स्वाभिमाने हा पुतळा उभा झालाय. मालवण किल्ल्यावर दुर्दैवी घटना झाल्यानंतर विक्रमी वेळेत पुन्हा हा पुतळा प्रस्थापित करू शकलो. मी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिनंदन करतो. शिवेंद्रराजे भोसले आणि रविंद्र चव्हाण यांचा काळात काम वेगाने झालं. सुतार साहेबांनी उत्तम पुतळा तयार केलाय. जर वादळं आली, त्या इन्टेन्सिटीचा अभ्यास करत हा पुतळा उभा करण्यात आला आहे. किमान १०० वर्षे कुठल्याही वातावरणात हा पुतळा टिकेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुतळा अनावरण सोहळ्यानंतर बोलताना दिली.

आयआयटीचे अभियंते आणि जे.जे महाविद्यालयीतल शिल्पकार हे पुतळा घडवताना सोबत होते. त्यामुळेच, जरी वादळं आली, तरी त्या इन्टेन्सिटीचा अभ्यास करत पुतळ्याची उभारणी करण्यात आली आहे. जवळपास ९३ फुट ऊंच हा पुतळा असून १० फुटाचा चबुतरा देखील आहे. विशेष म्हणजे देशातला सर्वात उंच पुतळा देखील हा आहे. किमान १०० वर्षे कुठल्याही वातावरणात पुतळा टिकेल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. पुतळ्याच्या मेन्टेनन्सची जबाबदारी पुढील १० वर्षांसाठी कंत्राटदार यांच्याकडेच असेल. आम्ही निर्धार केला होता कुठल्याही परिस्थितीत महाराजांना साजेसा पुतळा उभारू तो पूर्ण झालाय, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं.

वादळातही पुतळा टीकेल : शिल्पकार सुतार

पुतळा कोसळल्यानंतर नेमका तो का पडला असेल याची कारणं शोधली आणि त्यानंतर ह्या पुतळ्याची उभारणी केल्याचे शिल्पकार अनिल सुतार यांनी सांगितले. या आधीच्या पुतळयात फक्त लोखांडाचा वापर करण्यात आला होता, ज्यामुळे त्याला ३-४ महिन्यांत जंग लागला. त्यामुळे, ह्या पुतळ्याची उभारणी करताना आम्ही ब्रॉन्झ, झिंकसारख्या धातूंचा वापर केला. हेच धातू आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची निर्मिती करताना देखील वापरत आहोत. अशात, दीर्घकाळ हा टीकावा असं नियोजन केलं. तसेच, दुसरीकडे चक्रीवादळात देखील पुतळा टिकेल याचे नियोजन केल्याचे अनिल सुतार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. दरम्यान, महाराजांच्या पुतळ्याची उंची ६० फुट आहे, एकूण पुतळ्याची उंची तलवारीपर्यंत ९३ फूट आहे. सोबतच, चबुतरा १० फुटाचा आहे, असेही त्यांनी म्हटले.



## अशोक दुबाले पाटील बीड जिल्हा पोलीस पतसंस्थेच्या अध्यक्षपदी पुन्हा विराजमान

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अशोक अण्णा दुबाले पाटील साहेब यांची पुन्हा नियुक्ती झाली असून त्यांना सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा मिळत आहेत. बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस बांधवांच्या प्रश्नाला सातत्याने न्याय प्रशासनाच्या वतीने शासनाच्या वतीने न्याय मिळवून देण्यामध्ये यशस्वी ठरलेले असे बीड जिल्ह्यामध्ये ज्यांचे ख्याती आहेत आणि बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीवर कडक नजर ठेवून असणारे असे कर्तव्यदक्ष अशोक अण्णा दुबाले पाटील हे यशस्वी अध्यक्ष म्हणून पुन्हा बीड जिल्हा पोलीस पतसंस्थेच्या अध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. त्यांना सर्व बीड जिल्ह्यातील आप्तेष्ट नातेवाईक मित्र यांच्याकडून प्रत्यक्ष प्रत्यक्ष भ्रमर ध्वनिद्वारे व प्रत्यक्ष त्यांना भेटून मनस्वी पुढील कर्तव्यासाठी शुभेच्छा मिळत आहेत अशोक अण्णा दुबाले यांचे पोलीस प्रशासकीय कर्तव्य अतिशय उत्कृष्ट आहे म्हणून सर्वत्र त्यांच्या कर्तव्याबाबतीत समाधान व्यक्त केले जात आहे. आज याच पार्श्वभूमीवर त्यांचा आज सत्कार करण्यात आला. बीड जिल्हा पोलीस पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक अण्णा दुबाले पाटील साहेब व उपाध्यक्ष संघर्ष भैय्या गोरे साहेब तसेच संचालक सचिन जायभाय साहेब यांचा तिघांचाही मनस्वी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित असलेले बाळू दोडके सह मित्र परिवार उपस्थित होते. तसेच पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर, दैनिक न्याय टाइम्स बीड यांनी देखील कुलकर्णी कुक्कडगावकर परिवाराच्या वतीने व दैनिक न्याय टाइम्स परिवाराच्या वतीने अशोक अण्णा दुबाले पाटील यांना व संघर्ष गोरे साहेब हे उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल यांना व सचिन जायभाय संचालक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल यांना तिघांनाही मनस्वी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जिव्हाळा बेघर वृद्धाश्रम येथे फळे व खाऊ वाटप आज मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रातील अग्रगण्य नाव म्हणजे सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते विष्णूबाळ झोडगे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वरती गोरगरीब वृद्धाश्रम मधील वृद्धांसोबत फळे व खाऊ वाटप करून वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. वाढदिवसाचा खर्च वाचून गरजू गरीब समाजाने कुटुंबाने नाकारलेल्या वृद्धांसोबत बेघरांसोबत दरवर्षीप्रमाणे अगदी साध्या पद्धतीने, आत्मिक समाधान शोधत बेघरांना आणि ग्रंथांना फळे व खाऊ वाटप करून त्यांच्या आरोग्याची काळजी म्हणून बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ तथा मनका विकार तज्ञ डॉक्टर बालाजी नवले यांचे जिव्हाळा वृद्धाश्रम आणि प्रकल्पातील वृद्धांसाठी




मोफत हाडाची तपासणी तसेच मोफत मेडिसिन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विष्णुबाळ झोडगे यांच्या सामाजिक उपक्रमाला सर्व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

यामध्ये प्रमुख उपस्थित होते म्हणून तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे डॉ बालाजी नवले, हरि पवार सरपंच पूसरा, रमेश घुबडे वैद्यकीय अधिकारी, युवा नेते प्रकाश उजगरे, अंगद बहिर, सोमनाथ मुंडे, शुभम लोहारे, आदित्य तांगडे, चिकू बहीर, बाबासाहेब खोसे, अर्जुन सुरवसे, तसेच सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि विष्णुबाळ दत्तात्रय झोडगे मित्रपरिवार तसेच समदीप सामाजिक प्रतिष्ठान बीड, महाराजा मित्र मंडळ चे सर्व कर्मचारी उपस्थित होते. गेल्या नऊ वर्षांपासून आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमाने तसेच लोकांच्या गरजेला उतरेल अशा पद्धतीने साजरा करण्यात येत असल्याने सर्व स्तरातून विष्णुबाळ झोडगे यांना शुभेच्छा आणि कौतुक होत आहे.

पान १ वरून...

### अवैध दारू विक्रीचा धंदा पोलीस...

दारू व विना परवाना देशी-विदेशी दारू विक्री पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने जोमात सुरू आहे. याचा त्रास महिला, सर्वसामान्य नागरिक यांना होत आहे. याकडे वरिष्ठ अधिकार्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये गावोगावी एक ते पाच ठिकाणी गल्ली-बोळात अवैध देशी-विदेशी दारू विक्रीची दुकाने थाटली आहेत. या दुकानदारांना राजरोसपणे दिवसा व रात्री चारचाकी, दुचाकी गाडीवरून देशी व विदेशी दारूचे बॉक्स पोच केले जातात. अवैध दारू विक्रीचा धंदा पोलीस अधिकार्यांसह कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने मोठ्या धुमधडाक्यात चालू आहे. या अवैध व्यवसायामुळे सर्वसामान्यांचे संसार उद्धस्त झाले आहेत. तर अनेक लोक मरणही पावले आहेत. याला आशीर्वाद कोणाचा हा संशोधनाचा विषय आहे.

विशेष म्हणजे प्रत्येक गावात चार ते पाच दारूचे दुकान आहेत. दारू विक्रेत्यांकडून संबंधित असलेल्या बीट अंमलदार यांना हप्ता दिला जातो अशी माहिती स्थानिकच्या नागरिकांकडून मिळत आहे. अवैध दारू विक्री जमत असताना पोलीस प्रशासन गप्प का? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रत्येक बीट अंमलदार अवैध दारू विक्रेत्यांकडून हप्ता वसूल करण्यात मग्न आहे. यामुळे दारू विक्रेत्यांना पाठबळ मिळत आहे. अवैध धंद्यांसह दारूमुळे जिल्ह्यातील हजरो लोकांचे संसार अक्षरशः उद्धस्त झाले आहेत. पोलिसांच्या वरदहस्तामुळे अवैध दारू विक्री सुरू असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. यामुळे गावातील सामाजिक शांततेचा भंग केला जात आहे. नागरिकांमध्ये भितीचे वातावरण आहे. गुंडप्रवृत्तीच्या लोकांवर कारवाई कधी होणार? गावातील अवैध दारूविक्री बंद होणार कधी? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.

### परळी व अंबाजोगाई भागात दहशत...

तडोळी येथुन परळी वै. येथे ट्रॅक्टरचे काम करण्यासाठी व हप्ता भरण्यासाठी घरतुन २,७०,०००/- रुपये घेवुन मोटार सायकलवर परळी येथील शिवाजीचौकामधुन सातबारा आणण्यासाठी जलालपुर रोडवरली तलाठी कार्यालयाकडे मोटार सायकलने जात असतांना जलालपुर रोडच्या कमानीजवळ मो. सा. समोर पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ MH४४Z०८०६ आडवी लावुन आरोपी रघुनाथ फड व ईतर ७ ते ८ जण असे सर्व जण वेळुच्या काठ्या व लोखंडी रॉड घेवुन खाली उतरले व फिर्यादीस गाडीवरुन ओढुन खाली पाडले व रघुनाथ फड म्हणाला की, याला मारा याला सोडु नका भडवा लई माजला आहे असे म्हणाला त्यावेळ ईतर आरोपीतांनी फिर्यादीस खाली पाडुन तोंडावर पाठीवर काठीने सपासप मारहाण करुन जखमी केले व लोखंडी रॉड़ने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर मारले त्यामुळे फिर्यादी गंभीर जखमी झाला त्यावेळी आरोपीने फिर्यादीस फरशी उचलुन जिवे मारण्याचे उद्देशाने मारहाण केली. यात फिर्यादीचा डावा पाय फॅक्चर झाला. त्यावेळी रघुनाथ फड व इतरांनी फिर्यादीचा मोबाईल व पॅन्टच्या खीशातील २,७०,०००/- रुपये रोख काढुन घेतले फिर्यादी जोरजोरात ओरडल्याने जमाव जमला. तेंव्हा आरोपी स्कॉर्पिओ गाडीतुन निघुन गेले. जातांना म्हणाले की, तु आता वाचलास परंतु नंतर आम्ही तुला जिवंत सोडणार नाहीत अशी धमकी देवुन निघुन गेले वगैरे मचकुराचे फिर्याद वरुन सदरचा गुन्हा उीझउ कलम १५६(३) अन्वये मा. न्यायालयाचे आदेशाने दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे तपासात परळी शहर पोलीसांनी आरोपींचा बारकाईने शोध घेवुन सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी टोळी प्रमुख नामे रघुनाथ रामराव फड वय ३० वर्ष रा. रामनगर ता. परळी जि. बीड यास दिनांक ०७/०३/२०२५ रोजी अटक केली. तसेच गुन्ह्यातील आरोपी क्र. २) जगन्नाथ विक्रम फड वय ४५ वर्ष रा. बजरंग नगर परळी वै. जि. बीड. ३) सुदिप रावसाहेब सोनवणे वय २८ वर्ष रा. सिध्दर्थ नगर परळी वै. जि. बीड. ४) बालाजी अंकुश दहीफळे वय २४ वर्ष रा. माणिक नगर परळी वै. जि. बीड. ५) विलास बालाजी गिते वय २७ वर्ष रा. नंदागौळ ता. परळी वै. जि. बीड. यांना दिनांक २८/०३/२०२५ रोजी २०.३४ वा. अटक करुन तपास करण्यात आला व सदर गुन्ह्यातील ०२ आरोपी फरार आहेत. सदर टोळी ने आज पावेतो संघटीतरीत्या पो. स्टे. परळी शहर, संभाजीनगर व अंबाजोगाई ग्रामीण हद्दीत एकुण १० गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. ज्यात खुनाचा प्रयत्न, दुखापत करणे, दंगा करणे, कट रचणे, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणे, दरोडा टाकणे, रस्ता आडवीणे, मारहाण करणे, सरकारी कामात अडथळा आनने, गंभीर दुखापत करणे या सारखे गंभीरस्वरुपाचे गुन्हे केले आहेत. प्रस्तावात एकुण १० गुन्हे विचारात घेण्यात आले. त्यापैकी ०९ गुन्हयांची दखल न्यायालयाने घेतलेली असुन ०१ गुन्हा पोलीस तपासावर आहे. सर्व गुन्हे १० वर्षाच्या आतील असुन ०३ वर्षापेक्षा जास्त शिक्षेस पात्र आहेत. सदर टोळीचा टोळी प्रमुख याने स्वतःच्या व टोळीतील इतर सदस्यांच्या आर्थीक फायदयासाठी सदरचे गुन्हे केल्याचे पोलीस अधीक्षकांच्या चानाक्ष नजरेतुन लपुन राहीले नाही. त्यावरुन बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या सुचने वरुन सदर प्रकरणांत तपासी अधिकारी पोनि रघुनाथ नाचण पो.स्टे. परळी शहर यांनी अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई व उपविपोअ अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली सदर टोळी विरुध्द मोक्का कायद्या अंतर्गत प्रस्ताव तयार करुन दिनांक २९/०४/२०२५ रोजी पोलीस अधीक्षकांना सादर केला होता. पोलीस अधिक्षक, श्री नवनीत कॉवत यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक ०४/०५/२०२५ रोजी प्रस्ताव आपले शिफारशी सह विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांना सादर केला होता.

विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक ०७/०५/२०२५ रोजी नमूद संदर्भीय गुन्हयांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ मधील कलमांचा अंतर्भाव करण्याची परवानगी दिल्याने पोलीस अधीक्षक बीड यांनी सदर प्रकरणांचा पुढील तपास श्री. अनिल चोरमले, उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई यांचेकडे दिला आहे व मोक्का कायदयाचे कलम ३(१)(ळळ),३(२),३(४) समाविष्ठ करणे बाबत आदेशीत केले आहे. त्यावरुन उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई हे सदर गुन्हयांचा पुढील तपास करीत आहेत. सदर प्रकरणांत ०१ आरोपी अटक असुन ०२ आरोपी फरार आहेत. पोलीस त्यांच्या शोधात आहेत. तसेच नमूद गुन्हातील मा. न्यायालयाकडून जामीन मंजुर झालेल्या ०४ आरोपींचे जामीन रद्द करण्यासाठी तपास अधिकारी यांनी प्रस्ताव मा. न्यायालयात सादर केले आहेत.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनिल चोरमले, पोलीस निरीक्षक श्री उस्मान शेख, स्थागुशा बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री रघुनाथ नाचण, सपोनि योगेश शिंदे पो.अं. पंडीत पांचाळ, धनश्री भताने, किशोर घटमळ पो. स्टे. परळी शहर तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, निलेश ठाकुर, बिभीषण चव्हाण स्थागुशा बीड यांनी केली आहे. भविष्यातही शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगार व गुन्हेगारांच्या टोळयावर व कायद्याला न जुमानणाऱ्या व्यक्ती विरुध्द तसेच बीड जिल्ह्यात धुमाकुळ घालणाऱ्या गुन्हेगारांवर मोक्का व एम.पी.डी.ए. कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री नवनित कॉवत यांनी दिले आहेत.

### परळी स्थानकावर मॉक ड्रील

व बॉम्ब नाशक पथक बीड यांच्या संयुक्त विद्यमाने मॉक ड्रिल मध्ये बॉम्बसदृश वस्तू रेल्वे स्थानक परिसरात सापडल्याची कल्पित घटना दाखवण्यात आली. सदर बॅगची तपासणी करून बॉम्ब नाशक पथकाने ती सुरक्षितरित्या विल्हेवाट लावली.

या सरावामध्ये रेल्वे सुरक्षा बलाचे निरीक्षक एस.बी.कांबळे, उपनिरीक्षक किशोर मलकुनाईक, जीआरपीचे उपनिरीक्षक साबळे व इतर कर्मचारी, अग्निशमन विभागाचे सुनिल आदोडे, गजानन खांबट, बीड येथील बॉम्ब नाशक पथकाचे अधिकारी, रुग्णवाहिकेचे डॉ.सरिता मुंडे, विजयमाला टाक यांनी सक्रिय सहभाग घेतला. या मॉक ड्रिलमुळे रेल्वे स्थानकावर आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आणि समन्वयपूर्वक कारवाई कशी करावी याचे प्रशिक्षण देण्यात आले.

### पेठ बीड पोलीसांची मटका जुगार खेळणाऱ्यावर छापा...

मिळाल्यावरुन आम्ही पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज व सोबत पोह/ नसीर शेख, पोअं/अल्ताफ शेख, कलीम ईनामदार व चालक पोह/ असद शेख यांनी कडवा मंडी याठिकाणी छापा मारला असता काही ईसम हे कल्याण मटका नावाचा जुगार खेळताना मिळून आल्याने त्यांना तात्काळ ताब्यात घेण्यात आले. सदर इसमांच्या ताब्यातुन मोबाईल व रोख रक्कम असा एकुण ४०,०००/- रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक सो. नवनीत, अप्पर पोलिस अधीक्षक सो. सचिन सर, मा. उप-विभागीय पोलीस अधीकारी विश्वांभर सो. पहा मार्गदर्शन पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज पोह/ नसीर शेख, पोअं/अल्ताफ शेख, कलीम ईनामदार व चालक पोह/ असद शेख यांनी तळ बीड यांनी पार पाडली.

# देशात बसलेल्या घरभेद्यांनाही ठेचा!

पहेलगाममध्ये बंदुकींच्या गोळ्यांचा उच्छाद मांडणार्या पाकपुरस्कृत दहशतवादाला जशास तसं तोंड देणार्या भारतीय संरक्षण दलाच्या जवानांचं सुरुवातीलाच कौतुक.. दहशतवादाचं मुळ असलेल्या पाकिस्तानच्या तळांवर सुरू असलेल्या छुमश्चक्रीने देशवासीय आनंदले नसते तर नवलच. सरकारच्या नीतीवर कोणताही संशय न घेता संरक्षण दलांनी सुरु केलेल्या या कारवाईला सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका देशातील विरोधी पक्षांनी घेतल्याने सरकार म्हणून सत्ताधार्यांची जबाबदारी अधिकच वाढलीय. याचा अर्थ सैनिकांच्या नावाने स्वत:च्या छब्या नाचवणं नव्हे. वायू दलाने सियालकोटसह नऊ ठिकाणांना लक्ष्य करत पाकिस्तानला अस्तित्वाची जाणीव करून दिली आहे. याबद्दल तिन्ही दलाचं आणि केंद्रातल्या सरकारचं कौतुक केलंच पाहिजे. मात्र तरीही मागे वळून पाहिलं नाही तर पहेलगामसारख्या घटना घडतच राहतील. इतिहास विसरला तो वर्तमानाला तोंड देऊ शकत नाही आणि वर्तमानाकडे दुर्लक्ष करणारे भविष्य घडवू शकत नाही, हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही. काश्मीरमधील दहशतवाद निपटून काढण्यासाठी आवश्यक असलेल्या कारवाया वेळीच झाल्या असत्या तर पहेलगामसारखी घटना घडली नसती, हे मान्यच करावं लागेल. मात्र याविषयी कोणी बोलत नाही. जे बोलतात त्यांना देशद्रोहाच्या व्याख्येत बसवलं जातं. जाब विचारणार्यांच्या भूमिकेवर शंका घेतली जाते. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कारासारख्या घोषणा होतात. पोलिस आणि तत्सम यंत्रणांना त्याच्या मागावर लावलं जातं. यामुळे ज्या गोष्टींवर प्रकाश टाकायचा तो टाकला जात नाही. पुन्हा जैसे थे परिस्थिती निर्माण होते. मग पुलवामा आणि पहेलगाम घडतच रहातं.

श्श्पाकमधील दहशतवादी तळांवर भारताकडून हल्ले झाल्यावर देशातल्या तमाम लोकांनी जवानांचं कौतुक केलं. विरोधी पक्षांनी मागच्या घटना दुर्लक्षून सरकारला पूर्ण समर्थन दिलं. म्हणून सरकारला कोणाला अंधारात ठेवून निर्णय घेता येणार नाही. विरोधी पक्ष नेत्यांसह एकत्रित बैठका बोलवण्यात आल्या. पण तिथे पंतप्रधान मोदी उपस्थित नव्हते. गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर मोदी थेट बिहारला पोहोचतात. नंतर दिल्लीत असूनही बैठकीला येत नाहीत, याचा अर्थ न समण्याइतकी भारतीय जनता दुधखुळी नाही. मोदी बैठकीला आले नाहीत, अशी चर्चा होणं ही बाब देश संरक्षणासाठी घातक आहे, हे मोदींना कळत नाही? संकट काळात देशाच्या प्रमुखाने बैठकीला न येणं याचा अर्थ काय निघतो? तुम्ही काहीही सांगितलं तरी निर्णय घ्यायला मी मोकळा, असा हा अहंकार होय. या अहंकाराची चर्चा अशा गंभीर प्रसंगी करायची नाही? देशाच्या सुरक्षेत येणारा हा दांभिकपणा मोदींनी सोडला पाहिजे. तुम्ही काहीही करा, मला घ्यायचा तो निर्णय मी घेईन, ही दांडगाई देशाला परवडणारी नाही.

संरक्षण दलाने केलेल्या हल्ल्यानंतर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत असतानामहाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी यावर विचारलेल्या प्रश्नांनी सर्वांचंच लक्ष वेधलं आहे. सवयीप्रमाणे भाजप आणि सत्तेतले मंत्री राज यांना दोष द्यायला मोकळे आहेत. इतर कोणी सवाल केला असता तर या मंत्र्यांनी आणि भक्तांनी त्याला बदनाम करून सोडलं असतं. पण राज यांच्या सवालात असलेलं गांभीर्य सत्ताधार्यांनाही दुर्लक्षिता येत नसल्याने ते कचरत आहेत. राज यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर जाणकार बोलू लागले आहेत. युध्दाची चर्चा आपण एअरकंडिशनमध्ये बसून करत असताना पाकिस्तानवर हल्ले करण्यासाठी आपल्या जवानांना जोखिमा पत्करावया लागणार आहेत. जिवाची पर्वा न करता जवानांना परिस्थितीला तोंड द्यावं लागतं. अशा वेळी खर्चाच्या गणतीला मर्यादा राहत नाही. हा सारा भार देशवासीयांवर पडतो. आधीच महागाईने देशातला नागरिक भरडला जात असताना अशी युध्दजन्य परिस्थिती त्याला आणि त्यानुशंगाने देशाला परवडेल? या प्रश्नाचं उत्तर अर्थात नाही, हेच आहे. राज ठाकरे यांच्या अनेक प्रश्नांमधील ही गोष्ट नजरेआड करता येणार नाही. पाकिस्तान हा कर्जाऊ देश आहे. भारताचं तसं नाही. हा देश सार्वभौम लोकशाही अंगिकारलेला देश आहे. अशा लोकशाहीच्या देशात चर्चा होणं अत्यंत गरजेचं आहे. राज यांनी हे प्रश्न विचारताना आपल्यावर काय टीका होईल, आपल्याला काय जाब विचारला जाईल, याची तमा बाळगलेली नाही. पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी कारवाईनंतर हल्ला करणारे दहशतवादी गेले कुठे? याचा काही पत्ता आहे की नाही, हा साधा प्रश्न राज यांचा आहे. या ठिकाणपासून पाकिस्तान सीमा अडीचशे ते तीनशे किलोमीटर डोंगरपार अंतरावर असेल तर हे दहशतवादी गेले कुठे? ते हाती सापडत नाहीत, याचा दोष आपल्या यंत्रणांच्या अपयशाकडे जातो.


श्श्ही चुक एका पहेलगामपुरती मर्यादित असती तर एकवेळयाकडे दुर्लक्ष करता आलं असतं. सशस्त्र दलाच्या ४२ जवानांचा हकनाक बळी घेणार्या पुलवामा येथील दहशतवादी कारवाईतील एकाही अतिरेक्याला आपण धडा शिकवू शकलो नाही. हा हल्ला म्हणजे भारताच्या संरक्षण दलावरील काळा अध्याय होय. इतक्या संख्येने जवान प्राणाला मुकूनही दहशतवादी हाती का लागला नाही? करण थापर यांनी काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांची नुकतीच मुलाखत घेतली होती. पुलवामा हत्याकांडावेळी केंद्राने अंगिकारलेल्या एकाधिकारशाहीचा पुरता परदाफाश मलिक यांनी करून टाकला. तोच सवाल राज यांनी विचारलाय. या प्रश्नांची चर्चा होणार नसेल तर पहेलगामसारख्या घटना या होतच राहणार. सुरक्षा दल त्याकडे गांभीर्याने पाहत नसेल तर काहीही झालं तरी देश सुरक्षित राहील, असं खात्रीने कोणीही सांगू शकणार नाही. ज्याच्याकडे पुलवामाची जबाबदारी होती तो देविंदर सिंग हल्ल्याच्या महिनाभर आधी दिल्लीत येऊन सत्ताधार्यांच्या भेटी घेतो. आणि काश्मीरमध्ये गेल्यावर राज्यपालांच्या सूचनेकडे दुर्लक्ष करतो, पुढे त्याला बढती मिळते, असं का होतं. या घरभेद्याचं काहीच वाकडं झालं नाही.

दुसरीकडे देशातलेच काही लोक पैशांच्या अमिशाने आणि अश्लील चाळ्यांच्या नशेत देश विक्रीला काढत आहेत. मात्र तरीही त्यांची संघाचे स्वयंसेवक तरफदारी करत आहेत. या सत्तेत यातल्या एकालाही अजून शिक्षा झाल्याचं ऐकिवात नाही. प्रदिप कुरुळकर हा यातला प्यादा. स्वत:ला आरएसएसचा स्वयंसेवक म्हणवून घेणार्या या माणसाने झारा दासगुप्ता या आपली मुलगी समजावी अशा लंडनमधल्या छान छबिलीच्या नंगेपणाला भाळून संरक्षण संशोधन प्रणालीतील महत्वाची माहिती पाकिस्तानला पुरवली. ब्रम्होस आणि अग्नीसारखी क्षेपणास्त्रांच्या वापरासह संशोधन क्षेत्रातील अत्यंत महत्वाची माहिती पुरवणारा हा माणूस या क्षेत्रात ३० वर्षं काम करत होता. संजय शेरपुरीया हा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी अदित्यनाथ यांचा अत्यंत लाडका अधिकारी. या अधिकार्यानेही संरक्षण दलातील महत्वाची माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप झाला. पहेलगाममधल्या घटनेनंतर मध्यप्रदेशातून अकरा जणांना ताब्यात घेण्यात आलं. यातला एकजण हा भाजपचा कार्यकर्ता. जो आयटी सेलचा प्रमुख ध्रुव सक्सेना निघाला. तोही पाकिस्तानला माहिती पुरवायचा. पलकशेर मसिह आणि सुरज मसिह या दोघांना पंजाबमधून अटक झाली. हे दोघं पाकिस्तानला माहिती पुरवायचे. निशांत अगरवाल या अभियंत्याला झालेली अटक. सुरतगड चुरू येथील नितीन यादव आणि रामसिंह यांना हनीट्रॅपमध्ये झालेली कोठडी, ही सत्ताधारी पक्षाशी संबंधितांची जंत्री आहे. सतेंद्र सिवाल या भारतीय दुतावासात मल्टी टास्टिंग म्हणून काम करणार्या व्यक्तीला उत्तरप्रदेशच्या हापूडमधून तर लाभशंकर महेश्वरी याला तारापूर येथून अटक करण्यात आली. पहेलगामच्या हल्ल्याची माहिती असलेल्या अमित बिस्ट या आंध्रमधून आलेल्या अधिकार्याने संशयास्पद ठिकाणांवर तैनात असलेल्या २० सैनिकांना अचानक बदलण्याच्या मागचं गणित गंभीरच होतं. हे बिस्ट संरक्षण सल्लागार अजित दोभाल यांच्या जवळचे अधिकारी असल्याने त्यांनाही पहेलगामच्या सुरक्षेवर कोणीही जाब विरायला तयार नाही. पुंछच्या गोळीबारात धारातीर्थी पडलेल्या कारी महंमद इक्बाल या सैनिकाला थेट जैश-ए-महंमदचा अतिरेकी ठरवून त्याची बदनामी करणारे वाहिन्यांचे आगलावे अँकर असोत की देशाची माहिती शत्रूना पुरवणारे हनीटॅपर असोत, या घरभेद्यांना ठेचल्याशिवाय देश सुधारणार नाही, हे मात्र नक्की

**प्रशांत बाफना**
अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी
८०५५४४०३८५

# बीड जिल्हा महसूल विभागातील रत्न लेडी सिंघम
# शितल चाटे यांना लोक रत्न पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्हा महसूल विभागातील महसूल रत्न लेडी सिंघम म्हणून सर्वत्र परिचित असलेल्या श्रीमती शितलताई चाटे यांना महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे देण्यात येणारा लोक रत्न पुरस्कार जाहीर झाला असून छत्रपती संभाजी नगर येथे येत्या मे महिन्यामध्ये हा पुरस्कार देण्यात येणार आहे हा पुरस्कार देण्यासाठी राजस्थानचे राज्यपाल महामहीम हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. लोक रत्न पुरस्कार जाहीर होताच शितलताई चाटे यांचे सर्वत्र बीड जिल्ह्यामधून तसेच पाली महसुल विभागामधून तसेच आत्ता नुकताच चार्ज त्यांनी मांजरसुंबा मंडळ निरीक्षक म्हणून घेतला आहे. त्या मांजरसुंबा महसूल विभागामधून सर्वत्र अभिनंदन व त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे व त्यांना पुढील महसूल प्रशासकीय कर्तव्यासाठी सर्वांच्या वतीने शुभेच्छा देण्यात येत आहेत याच पार्श्वभूमीवर त्यांची त्यांच्या ऑफिसमध्ये प्रत्यक्षात भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देऊन लेडी सिंघम श्रीमती शितलताई चाटे मंडळ निरीक्षक यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.




यावेळी उपस्थित असलेले बीड जिल्हा महसूल विभागातील माजी मंडळ निरीक्षक देशमुख साहेब तसेच उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष तथा आदर्श पोलखोलचे संपादक नितेश कुमारजी उपाध्ये साहेब तसेच पाली येथील सरपंच नवले साहेब तसेच पाली येथील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह मान्यवर उपस्थित होते.
एकंदरीतच बीड जिल्हा महसूल विभागातील अतिशय चांगल्या प्रकारे आणि प्रामाणिकपणे महसूल विभागाचे आपले कर्तव्य बजावणाऱ्या सर्वांना महसूल प्रशासनाच्या योजनेच्या बाबतीत माहिती देणाऱ्या अशा दयाळू आणि संयमी व मनमिळावू स्वभावाच्या सर्वांना उत्कृष्ट अशा वेळोवेळी मार्गदर्शन करणाऱ्या आणि ज्या ज्या ठिकाणी त्यांनी तलाठी म्हणून काम केले आहे तसेच आता मंडळ निरीक्षक म्हणून आपली उत्कृष्ट सेवा बजवत आहेत अशा गावच्या सर्व नागरिकांच्या व सर्व शेतकऱ्यांच्या मनामध्ये एक आगळे वेगळे आपल्या उत्कृष्ट महसूल प्रशासकीय कर्तव्यातून लोकांच्या मनामध्ये आगळे वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या अशा लेडी सिंघम म्हणून सर्वत्र परिचित असलेल्या शितलताई चाटे यांच्या महसूल कर्तव्याच्या बाबतीत बीड जिल्ह्यामधून तसेच बीड तालुक्यामधून सर्वत्र नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्या अतिशय उत्कृष्ट आपली महसूल प्रशासकीय सेवा बजावत असून अनेक शेतकऱ्यांना तसेच पीडित कुटुंबांना त्यांनी शासन प्रशासन दरबारी न्याय मिळवून दिला आहे आणि त्या न्याय मिळवून देण्यामध्ये यशस्वी ठरलेल्या अशा महसूल विभागातील महसूल रत्न म्हणून बीड जिल्हा महसूल विभागाला लाभलेल्या श्रीमती लेडी सिंघम शितलताई चाटे या सर्वत्र सध्या लेडी सिंघम म्हणून बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र परिचित आहेत त्यांना हा लोक रत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## अर्ध्या परळी शहरात आठ दिवसापासून निर्जळी



परळी वैजनाथ । प्रतिनिधी
परळी शहराच्या चारही बाजुने रस्त्याची कामे सुरू आहेत. यासाठी गुत्तेदाराकडून कुठलीही काळजी घेण्यात येत नसून टीपीएस कॉलनी जवळ गुत्तेदाराने शहराला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फोडल्यामुळे आठ दिवसापासून अर्ध्या परळी शहरात निर्जळी असल्याने नागरिकाची पाण्यासाठी तारांबळ उडत आहे. यासाठी गुत्तेदाराने लवकर पाईपलाईनचे काम करण्यात यावी अशी मागणी नागरिकांत दिसून येत आहे.



बीड नगरपालिका यांचे पूर्णपणे दुर्लक्ष आठ ते नऊ महिन्यापूर्वी नाल्या स्वच्छ केले असता आता नाल्या और फुल होऊन घाण बाहेर येत आहे तरी नगरपालिका कर्मचारी व बार्शी नाका चे एस आय काळकुटे साहेब कॉल घेत नाहीत व नगरपालिकेचे सी ओ मॅडम यांचा बीड शहराची स्वच्छता करण्यात यावी अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्ष बीड शहराध्यक्ष दीपक पवार करीत आहे.

## भारतीय सैनिकांसाठी उद्या बीडमध्ये मोटरसायकल तिरंगा रॅली; देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : शेख निजाम

बीड । प्रतिनिधी
पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर राबवत भारताने पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्धस्त केले. पाकिस्तानच्या प्रत्येक हल्ल्यावर जशास तसे उत्तर भारत देत आहे. भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी उद्या दि.११ मे २०२५ रोजी सकाळी दहा वाजता बीडमध्ये मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे. एक देशभक्त, भारतीय नागरिक म्हणून ही रॅली काढण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेख निजाम यांनी केले आहे.
भारतीय सैनिकांनी जम्मू काश्मीर मधील पहलगाम हल्ल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' राबवत शत्रू राष्ट्र असलेल्या पाकिस्तानवर एअरस्ट्राइक करत प्रत्युत्तर देऊन अनेक दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. पहलगामच्या हल्ल्यातील नागरिकांच्या जखमा ओल्या असताना क्षणार्धात पाकिस्तानात घुसून आपल्या भारतीय भुदल,नौदल आणि हवाईदलाच्या जांबाज आधिकाऱ्यांनी आणि जवानांनी दाखविलेल्या साहसाला आणि धैर्याला सलाम करून खरोखरचं देशप्रेमाची भावना जागी करण्यात आली. यामुळे बीडमध्ये उद्या दि. ११ मे रोजी सकाळी १० वाजता तिरंगा रॅली काढून भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापुतळ्यापासून दुचाकी रॅलीला सुरुवात होणार आहे. माळीवेस, सुभाष रोड, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेख निजाम, शेख अमर, कय्युम इनामदार, सय्यद फईम, जयंत वाघ, सत्तार इनामदार, सय्यद आझम, शेख जाकीर, शेख नसिर यांनी केले आहे.



## संस्कार आणि शिस्त हेच जीवनाचे सूत्र : डॉ.कराळे

केज । प्रतिनिधी
मानवी जीवन हे अनेक प्रश्न, उत्तरे आणि अनुभव यातून भरलेले आहे. यात सुख दुःख, संकटे आणि संघर्ष अटळ असून अनपेक्षित आणि आपत्कालीन घडणाऱ्या घटनाही आहेत. यावर मात करण्यासाठी बी एड अध्यापनात झालेले संस्कार व शिस्त हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. नागेश कराळे यांनी केले. ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज येथे बी एड् द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोप समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.
कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर हे होते. त्यावेळी प्रा. जयश्री कचरे, प्रा. उषा बलाढ्ये व श्री सुजित नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ सौदागर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या जीवनातील बी एड् वर्ष हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. जीवनाची दिशा ठरवणारे असून आपल्याला कर्तव्याची जाणीव करून देणारे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास कांबळे यांनी आभार पूजा भोसले यांनी मानले. यावेळी बीएड अध्यापक छात्र हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपेक्षितांना सामाजिक न्याय मिळणार असून महापुरुषांचे स्वप्न साकार होणार : डॉ.अर्जुने

बीड । प्रतिनिधी
समाजातील दलीत, शोषित आणि अतीवंचित जातींचा उद्धार व्हायला हवा समाज सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न होते. आरक्षण उपवर्गीकरणाच्या माध्यमातून उपेक्षितांना सामाजिक न्याय मिळणार असून महापुरुषांचे स्वप्न साकार होणार आहे, असे प्रतिपादन डॉ.दिलीप अर्जुने यांनी केले. २० मे रोजी मुंबई येथे आझाद मैदानात होऊ घातलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गात आरक्षण उपवर्गीकरण जनआक्रोश महाआंदोलन मोर्चा जनजागृती निमित्त परतूर तालुक्यातील श्रीष्ठी गावात डॉ.दिलीप अर्जुने बोलत होते.याप्रसंगी मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.



पुढे बोलतांना डॉ.दिलीप अर्जुने म्हंटले की, दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना अनुसूचित जातींमध्ये उप-वर्गीकरण करण्याचा संवैधानिक अधिकार दिला. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या अधिक मागासलेल्या जातींना आरक्षणाचा लाभ देणे हा त्याचा उद्देश होता. देशातील पंजाब आणि हरियाणा राज्या प्रमाणे अनुसूचित जाती प्रवर्गात आरक्षण उपवर्गीकरण करतांना वंचित जातींना सर्वाधिक लाभ मिळावा. याकरीता महाराष्ट्र सरकारने निर्णय घ्यावा. राज्य सरकारने आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ आमलबजावनी करावी आणि येत्या शैक्षणिक वर्षापासून आपल्या समाजातील विद्यार्थ्यांना आरक्षणात समतेचा सामाजिक लाभ मिळावा याकरीता समाज बांधवांनी २० मे रोजी मुंबई येथील जन आक्रोश महाआंदोलन मोर्च्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ.दिलीप अर्जुने यांनी केले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते शिवराज जाधव, सुनील कांबळे, आकाश साबळे, विलास साबळे, विठ्ठल साबळे, सोनू साबळे, राजेश साबळे यांची उपस्थिती होती.



## आडसकर चषक राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

केज । प्रतिनिधी
केज तालुक्यातील युवा प्रतिभेला व्यासपीठ मिळावे आणि ग्रामीण खेळाडूंना राज्यपातळीवर चमकण्याची संधी मिळावी या उदात्त हेतूने राजमुद्रा ग्रुप, केज यांच्या वतीने 'आडसकर चषक राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन नुकतेच मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडले.
उद्घाटन समारंभात कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गेवराई विधान सभेचे आमदार विजयसिंहराजे पंडित हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर तसेच अन्य प्रमुख पाहुण्यांनीही उपस्थिती लावली. स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यां मधून एकूण ३७ संघ सहभागी झाले असून, ही स्पर्धा ७ दिवस चालणार आहे. सामन्यांसाठी अत्याधुनिक व्यवस्था, अंपायर्सची योग्य निवड आणि प्रेक्षकांसाठी उत्तम सुविधा करण्यात आल्या आहेत. आडसकर चषक विजेत्या संघासाठी रोख पारितोषिक २ लाख ९२१ रुपये, उप विजेत्या संघाला १ लाख ९२१ रुपये तर तृतीय संघास ५० हजार ९२१ रुपये व चौथ्या स्थानी येणाऱ्या संघास ३० हजार ९२१ रुपये, तर पाचव्यास्थानी येणाऱ्या संघास प्रत्येकी २९ हजार ९२१ रुपये तसेच सन्मानचिन्ह आणि ट्रॉफीचे वितरण केले जाणार आहे. या उपक्रमामुळे राज्यभरा तील युवा खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण झाली आहे. या स्पर्धेच्या आयोजनाबद्दल राजमुद्रा ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सर्वेसर्वा अमर पाटील याचे सर्वत्र कौतुक होत असून, केज तालुक्याला खेळाच्या क्षेत्रात वेगळी ओळख मिळवून देण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे.

## डॉ. बालाजी नवले यांची वृद्धाश्रमात वैद्यकीय सेवा

### विष्णूबाळ झोडगे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम



बीड । प्रतिनिधी
बीड जिल्ह्यातील नव्याने सुरू झालेले तिरुपती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि स्पाइन सेंटर बीडच्या वतीने जिल्ह्यातील सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ तथा अस्थिरोग तज्ञ डॉक्टर बालाजी नवले यांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते विष्णूबाळ झोडगे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमाला हातभार म्हणून बीड येथील भाजी मंडई मध्ये जिव्हाळा बेघरांच्या हक्काचे घर वृद्धाश्रम व अनाथ वृद्धांना मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि मोफत मेडिकल देण्यात आले. या मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि सामाजिक उपक्रमांमध्ये जीवाला वृद्धाश्रम येथील वृद्धांना अस्थिरोग तपासणी हाडाचे कॅल्शियम तपासणे तसेच इतर हाडा संबंधित तपासण्या करून मोफत औषधी गोळ्या देण्यात आल्या.
या वृद्धाश्रम मध्ये अनेक गरजू रुग्ण आहेत त्यांना मेडिसिन अत्यंत गरज आहे अशांची गरज लक्षात घेता सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते विष्णूबाळ झोडगे यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि डॉ. बालाजी नवले यांच्या मार्गदर्शनाने तसेच महाराजा मित्र मंडळ आणि समदीप सामाजिक प्रतिष्ठानच्या पुढाकाराने हा सामाजिक उपक्रम पार पडला. या सामाजिक उपक्रमाला डॉ बालाजी नवले यांनी जातीने उपस्थित राहून वृद्धांना व अनाथांना सेवा दिली. त्याबद्दल जिव्हाळा वृद्धाश्रमाने त्यांचे स्वागत व सन्मान करून त्यांचे कौतुक केले. यावेळी विष्णुबाळ दत्तात्रय झोडगे मित्रपरिवार तसेच महाराजा मित्रपरिवार आणि समदीप सामाजिक प्रतिष्ठान चे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ईट गंगनाथवाडीचे उपसरपंच शंकर कदम पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा



बीड । प्रतिनिधी
बीड तालुक्यातील ईट गंगनाथवाडी येथील उपसरपंच शंकर कदम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बीड शहरातील जिव्हाळा निवास बेगर या ठिकाणी वाढदिवसानिमित्त गोरगरीब अनाथ वृद्धांना फळे वाटप अन्नदान चा कार्यक्रम मित्र परिवारांनी आयोजित केला होता. याप्रसंगी डीजे न वाजवता गोरगरीब वृद्ध परिवारा समवेत वाढदिवस साजरा केला.
याप्रसंगी कदम पाटील आपल्या भाषणात म्हणाले आहेत की तरुणांनी व्यर्थ खर्च न करता सामाजिक बांधिलकी जोपासत आपण आपलं कार्य केले पाहिजे, गोरगरीब जनतेची सेवा आपल्या माध्यमातून झाली पाहिजे. याप्रसंगी त्यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला होता. सध्या भारत पाकिस्तान युद्ध चालू आहे. त्या युद्धामध्ये आपण एन्जॉय करणं हे चुकीच आहे त्या मतावर ते ठाम होते, पण मित्र परिवाराने एक सामाजिक बांधिलकी जोपासत वृद्धाश्रमामध्ये अनाथ वृद्धांना फळ वाटप व अन्नदान कार्यक्रम देण्यात आला होता, तसेच याप्रसंगी या कार्यक्रमाला उपस्थित या निवारा बेगर प्रकल्पाचे संचालक राजु वंजारे सर, परमेश्वर गोंडे पाटील, राजेश शिंदे, युवा नेते राम जाधव पाटील, समाधान खिंडकर, केशव खांडे विष्णू बाप्पा खांडे, रुग्नसेवक शरद झोडगे, बंजारा समाजाचे युवा नेते सुरेश पवार, विजय बहीर, युवा पत्रकार अंकुश गवळी, सुरेश ढोरमारे, अजय जाधव, सुदर्शन खांडे पाटील, प्रा. मसुराम गोंडे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी शंकर कदम पाटील यांना वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्यातून शुभेच्छांचा वर्षाव, विविध क्षेत्रातील सामाजिक राजकीय शैक्षणिक पत्रकरिता क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# अखेर पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या पाटोदा तालुक्यातील बेडुकवाडी येथील शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल

## पोलिस प्रशासनाच्या मदतीने पवनचक्की कंपन्यांची रझाकारी सुरू : डॉ.गणेश ढवळे

पाटोदा । प्रतिनिधी

जिल्हा आणि पोलिस प्रशासन पवन आणि सौर ऊर्जा कंपनीच्यांचे हस्तक झालेले असुन कंपन्यांना शेत जमीनीचा ताबा देण्यासाठी पोलिस प्रशासन अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन मावेजा मागणाऱ्या शेतकऱ्यांनाच पोलिसी खाक्या दाखवत असुन खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचे प्रकार पाटोदा तालुक्यात आढळून येत असतानाच पाटोदा तालुक्यातील दासखेड ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकरी शिवाजी बाजीराव शिंदे, बालाजी शिवाजी शिंदे आणि जेसीबी आपरेटर या तिघांवर ओटु पवनचक्की कंपनीचे कर्मचारी मोहन रामा गाडे यांच्या तक्रारीवरुन भादंवि ११५(२), १२६ (२), ३०८(२), आणि ३०८(३)(५) कामाला विरोध करणे, जाणिवपूर्वक हत्येचा प्रयत्न करणे आदी कलमांतर्गत दाखल करण्यात आल्याचा दुर्दैवी प्रकार घडला आहे.

जर जिल्हा आणि पोलिस प्रशासन शेतकऱ्यांवरच अन्याय करत असेल तर शेतकऱ्यांनी मावेजा मागण्यासाठी कोणाच्या दारात जायचे. पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना प्रत्यक्ष भेटून जनता दरबारात आपली व्यथा मांडली परंतु त्यांना न्याय देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी असमर्थता दाखवली. त्यामुळे जे जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या जमिनी कंपन्यांच्या ताब्यात देण्यासाठी अमर्याद अधिकार वापरते ते प्रशासन शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाची आस्थेवाईकपणे चौकशी करत नाही आणि लोकप्रतिनिधी याबद्दल चकार शब्द काढत नाहीत हि शोकांतिका असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

**आम्हाला न विचारताच आमच्या शेतजमिनीत तारा ओढण्यास विरोध केला म्हणून आमच्यावर खोटे गुन्हे दाखल केले : शिवाजी शिंदे व बालाजी शिंदे**

पाटोदा तालुक्यातील दासखेड ग्रूप ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील शेतकरी शिवाजी बाजीराव शिंदे आणि त्यांचा मुलगा बालाजी शिंदे यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी संवाद साधताना काल दि.१० शनिवार रोजी सायंकाळी आमच्या शेतातुन उच्च दाबाची विद्युत तार ओढणा-या ओटु कंपनीच्या कर्मचाऱ्यांना विरोध केला असता. सायंकाळी ७ वाजता गावातील काही जण व कंपनीचे कर्मचारी आणि १ बंदुकधारी पोलिस असे ३०-४० लोक आले आणि त्यांनी आम्हाला धक्काबुक्की करत तुम्हाला काय विचारायचे?? मावेजा वगैरे काही मिळणार नाही म्हणून खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. यावेळी उपस्थित बंदुकधारी पोलिस यांनी काहिही न करता फक्त बघत बसले. आम्ही पाणाड्याकडुन याठिकाणी बोर व विहिरीसाठी जागा बघितलेली असुन येथून विद्युत तार गेल्यावर विहिर कशी खोदणार असा प्रश्न उपस्थित केला. शिवाजी शिंदे यांचा मुलगा बालाजी शिंदे यांना पाटोदा पोलिस स्टेशनचे बीट अंमलदार यांनी फोन करून तुमच्यावर गुन्हे दाखल करण्यात आला असल्याचे सांगितले. तुम्ही कशाला विरोधात जाता म्हणून आमची बाजु ऐकुन न घेताच आम्हालाच विरोध न करण्याचा सल्ला दिल्याचे म्हटले आहे.

**पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल दुर्दैवी ;**

**शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या लोकप्रतिनिधींना किंमत चुकवावी लागेल**

पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना दमदाटी, धमकावणे, त्यांना न विचारताच त्यांच्या शेतात काम करणे, मावेजा न देणे, विविध शेतकऱ्यांना वेगवेगळे मावेजा देणे, धनादेश न वटणे असे सर्रास प्रकार घडत असताना आता शेतकऱ्यांवर पोलिस प्रशासनाच्या मदतीने गुन्हे दाखल करणे दुर्दैवी आहे.

लोकप्रतिनिधी ऐरवी शेतकऱ्यांचे आम्हीच कैवारी म्हणून गळा काढतात. सध्या शेतकरी या पवनचक्की कंपन्यांकडून नागवला जात आहे. जिल्हा व पोलीस प्रशासनाला हाताशी धरून कंपन्या शेतकऱ्यांच्या जमिनी घशात घालत आहेत. मात्र लोकप्रतिनिधी याबाबत जिल्हा प्रशासन अथवा पवनचक्की कंपन्यांना साधा जाब विचारायला तयार नाहीत.याची किंमत लोकप्रतिनिधींना निवडणुकीत मतदानाच्या वेळी चुकवावी लागणार असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे. जिल्हा व पोलीस प्रशासन कंपन्यांच्या हातचे बाहुले झाल्याने त्यांच्या कडुन न्यायाची अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही.



# गेवराईच्या आगारात पाच 'लालपरी' बस दाखल

## आ. पंडितांनी उपस्थितीत बसचे लोकार्पण, आमदारांचा लालपरीतुन प्रवास



गेवराई । प्रतिनिधी

परिवहन महामंडळाने आज बीडमधील गेवराईच्या आगाराला पाच नविन 'लालपरी'बस अखेर उपलब्ध करून दिल्या आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत या बसची विधिवत पूजन करून प्रवाशांच्या सेवेत सुपूर्द करण्यात आल्या. दरम्यान आमदार यांच्यासाठी राखीव असलेल्या असनावर बसून आ. विजयसिंह पंडितांनी काही किलोमीटर प्रवास देखील केला. गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांचे गेवराई आगारासाठी पाच नवीन लालपरी बस उपलब्ध कराव्यात यासाठी प्रयत्न सुरू होते. त्यांच्या प्रयत्नाला अखेर यश मिळाले असून, काल उशिरा गेवराई आगारात पाच नविन 'लालपरी'बस दाखल झाल्या. शनिवार (ता.१०) मे रोजी आ विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत लालपरी बसचे विधिवत पूजन करून प्रवाशांच्या सेवेसाठी सुपूर्द करण्यात आल्या. नवीन बस उपलब्ध झाल्यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर सुविधा मिळणार आहेत. या प्रसंगी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार व्यक्त केले. दरम्यान आमदारासाठी राखीव असलेल्या आसनावर बसून आमदार यांनी काही किलोमीटर प्रवास केला.

# एस पी.साहेब सिरसदेवी परिसरातील वाळू माफियाला कायद्याचा धाक राहिला नाही

## पुढे सिल्वर कलरची स्कॉर्पिओ आणि मागे वाळूने भरलेला हायवा

**खुलेआम अवैध वाळू वाहतूक सुरु**

सिरसदेवी । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी सरात गेली अनेक दिवसा पासून सुसाट वेगाने दोन हायवा वाळूने भरलेल्या सिरसदेवी गावातून सिरसदेवी फाटा कडे जातात तसेच एक सिल्वर कलरची स्कॉर्पिओ पुढे लोकेशन देणारी पुढे असती तर हायवा मागे असतो दिवसा ढवळ्या या वाळू माफियाचे धाडस कोनामुळे होते याचा तपास एस.पी. कॉवत साहेबांनी लावला पाहिजे. तलवाडा पोलीस स्टेशनंच्या हदीतील सिरसदेवी परिसरात कोणाच्या आशीर्वादा दोन हायवा सुसाट वेगात गावातून फाट्यावर जातात तरी कुठल्याच अधिकाऱ्यला किंवा पोलीस प्रशासनाला का दिसत नाहीत.? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी काल दि.०९ /०५/२०२५ रोजी गेवराई येते जनता दरबार घेतला परंतु वाळू माफिया विरोदात कसल्याही प्रकारचे भाषण केले नाही. यामुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. सिरसदेवी परिसरात खुले आम दिवसा ढवळ्या अवैध वाळू वाहतूक होत असताना पोलीस प्रशासन का कारवाई करत नाही असा एक प्रश्न उपस्थित होत आहे. याच वाळू माफिया विरोदात पत्रकार शाम अडागळे यांनी एस पी साहेब यांनी सांगितलेल्या क्यू आर कोड वर तक्रार केली होती परंतु कुठलीही कारवाई न होता उलट याच वाळू माफियाला तक्रार कोणी दिली यांची माहिती मिळाली यामुळे एस पी कॉवत साहेबांनी सर्वसामान्य साठी काढलेल्या क्यू आर कोड वर तक्रार करणाऱ्यावर विश्वास उडाला आहे. वाळू माफियाच्या विरोधात कोण तक्रार देत आहे यांची माहिती जर कोणी देत असेल तर या कोड वर कोणी तक्रार देणार नाही यामुळे एस पी साहेबांनी याचा शोध घेऊन तक्रार कोणी दिली यांची माहिती देणाऱ्यावर कायदेशीर करावी. तसेच सिरसदेवी परिसरातील वाळू माफिया विरोदात कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांतून होत आहे.





# साठवण तलावातील अवैध पाणी उपसा तात्काळ बंद करा : सारुक

मौजे जिवाचीवाडी येथील साठवण तलावातील अनधिकृत पाणी उपसा बंद करणे संदर्भात अप्पर जिल्हाधिकारी यांना पत्रक सादर

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील जिवाचीवाडी येथील साठवण तलावातील विद्युत मोटारीद्वारे अनधिकृत पाणी उपसा चालू आहे. भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेता अवैध पाणी उपसा बंद करणे आवश्यक आहे असे पत्रक अप्पर जिल्हाधिकारी अंबाजोगाई येथे सादर करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मौजे जीवाचीवाडी येथील साठवण तलावातील पाणी उपसा बंद करणे संदर्भात तहसील कार्यालय केज यांचा आदेश दिनांक १०/२/२०२५ रोजी मंडळ अधिकारी विभाग विडा व ग्राम महसूल अधिकारी यांना अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. तहसीलदार यांनी विद्युत मोटार काढण्यासाठी दिनांक चार चार २०२५ रोजी आदेश काढण्यात आला होता, तहसीलदार यांनी आदेशित करूनही साठवण तलावातील विद्युत मोटारीने अवैध पाणी उपसा चालूच आहे.

> मौजे जिवाचीवाडी येथील साठवण तलावातील विद्युत मोटारी काढून अवैध पाणी उपसा बंद करावा या संदर्भात पत्र सुभास सखाराम सारुक यांनी तहसीलदार केज व अप्पर जिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना सादर केले आहे.

# इंग्रजी शाळेचे भूत पालकांच्या छाताडावर नाचत आहे


## शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान मोरे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर

शिरूर (का.) । प्रतिनिधी

मराठवाड्यातील ग्रामीण भागात इंग्रजी शाळेचे नको तेवढे पेवे फुटले आहेत इयत्ता पहिलीतल्या पोराने पाण्याला वॉटर म्हणले की पालक खुश पालकांची हीच नाडी ओळखून इंग्रजी शाळेचे ठेकेदारांचे फावले आहे. मराठवाड्यातल्या काही अपवादात्मक इंग्रजी शाळा वगळता किती इंग्रजी शाळा कडे सक्षम मनुष्यबळ आहे संशोधनाचा विषय आहे मात्र सध्या इंग्रजी शाळेचे भूत चांगलेच पालकांच्या मानगुटी वर बसल्याचे चित्र आहे ही सगळी स्थिती अशी असली तरी आता हळूहळू जिल्हा परिषद च्या मराठी शाळा कात टाकताना पाहायला मिळत आहे बीड जिल्ह्यातील ४०० हुन अधिक इंग्रजी शाळा आहेत इंग्रजीचे उत्तम ज्ञान दिले जात असल्याचा दावा सगळ्याच इंग्रजी शाळा करतात मात्र वास्तव चित्र भयानक आहे काही अपवादत्मक शाळा वगळता इतर इंग्रजी माध्यमांच्या शाळांची अत्यंत दळभद्र स्थिती आहे इंग्रजी माध्यमांच्या शाळा कडून शासनाच्या कुठल्या नियमाची अंमलबजावणी होत नाही.

याबाबत वारंवार चर्चा होत ते मात्र प्रत्यक्षात पालकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने शासन अथवा स्थानिक कुठलीच कारवाई करत नाही जाहिरातीच्या माध्यमातून पालकांना आकर्षित करून इंग्रजी माध्यमांमध्ये प्रवेश मिळवले जातात हे जर जाहीर आहे प्रवेशानंतर मात्र पुस्तकांची कीट शाळेकडूनच घेणे बंधनकारक केले जाते त्यासाठी यत्तेनुसार सात हजार ते आठ हजार रुपये पालकांकडून उकळले जातात एवढेच नाही तर विद्यार्थ्यांसाठी लागणारे स्वीच व कपडे शाळा सांगेल त्याच दुकानदाराकडून घ्या शिवाय वाहतुकीसाठी वेगळी शुल्क आकारले जाते चांगल्या शिक्षणासाठी या सगळ्या बाबी खरंच महत्त्वाच्या आहेत का किंवा इंग्रजी शाळा सांगतात ते सगळे ऐकल्यानंतर खरंच मुलं शिक्षणाच्या बाबतीत यशोशिखरावर पोचणार का हा प्रश्न प्रत्येक पालकांना विचारात घेणे आवश्यक आहे कारण या इंग्रजी शाळेमधील घाण सवयी सांगतो मुलांनी इंग्रजी शाळेमध्ये प्रवेश करेपर्यंत मुलाच्या वडिलांना जाळ्यात ओढलं जातं सांगतात आमच्याकडे १०००० ते १५०००हाजार फी मध्ये मुलांच्या पुस्तकापासून ते बूट डब्यापर्यंत ते बस येण्या-जाण्यासाठी आम्ही मुलांना पोहोचणार त्यानंतर मुलगा त्या इंग्रजी शाळेमध्ये प्रवेश झाल्याच्या नंतर सांगितलेलं वेगळंच असतं आणि मुलांना आडवनुक वेगळीच केली जाते दहा हजार फीस च्या ऐवजी २० ते २५ हजाराकडे





त्या मुलांचे फीस जाते त्या मुलांनी फीस वेळेवर भरली नाही की लगेच मुलांना तासून तास शाळेच्या बाहेर उभा करतात परीक्षा चालू असताना पेपरला बसू देत नाहीत एवढ्या मोठ्या मुलांमध्ये त्याच मुलांना बाहेर उभा करणे म्हणजे खूप दुर्दैवी घटना आहे पालकांनो सावध व्हा आपले मुले जिल्हा परिषद शाळेमध्ये टाका. इंग्रजी शाळेचे नखरे व मराठवाड्यातील इंग्रजी शाळा कडून पालकांचे होणारे आर्थिक लूट हा एक गंभीर आणि सतत चर्चेत असलेला विषय आहे

फी भरली नाही तर विद्यार्थ्याला परीक्षेला बसू देणार नाही ऑनलाइन वर्गात सहभागी होऊ देणार नाही अशी थेट धमकी दिली जाते पालकांनी विरोध केल्यास विद्यार्थ्यांवर मानसिक तणाव आणला जातो. ज्यादा शिल्लक आकारणी. मराठवाड्यातील अनेक खाजगी इंग्रजी शाळा केवळ ट्युशन फीस च्या नावाखाली नव्हे तर वेगवेगळ्या अकारणासाठी अतिरिक्त शिल्लक आकारतात स्त्रगिनक शुल्क ऍडमिशन फी दरवर्षी नवीन प्रवेशासाठी ज्यादा रक्कम आकारली जाते जरी विद्यार्थी त्याच शाळेत परत प्रवेश घेत असेल तरी संपूर्ण वर्षाच्या शुल्क एकाच वेळी भरण्याची शक्ती पालकांवर तातडीचा आर्थिक बोजा येतो अन्यावारी साहित्य विक्री पुस्तके वही गणवेश बुट इत्यादी शाळेच्या ठराविक दुकानातून खरेदी करावी लागते जेथे दर नेहमीच जास्त असतात. विनाअनुदानित शाळांचे गैर व्यवहार विनाअनुदानित शाळा कोणत्याही सरकारी नियंत्रणाखाली नसल्यामुळे पारदर्शकतेचा अभाव असतो त्यामुळे शिल्लक जर नियमानुसार जाहीर न करता वाढले जातात शाळा व्यवस्थापन समितीच्या अनुपस्थितीत निर्णय घेतले जातात. ऑनलाईन शिक्षणा दरम्यानही फुल फीस वसुली कोरोना महामारी दरम्यानही अनेक शाळांनी ऑनलाईन शिक्षणासाठी ही पूर्ण शैक्षणिक शिल्लक मागितले इंटरनेट खर्च शिक्षकांची आकारक्षमता असूनही पालकांना संपूर्ण फी द्यावी लागली. सरकारी नियंत्रणाचा निष्क्रिय सहभाग

शिक्षण अधिकारी किंवा स्थानिक प्रशासनाकडून तपासणी होत नाही तक्रारी असूनही कारवाई कमीच होते. जि प च्या शाळांनी टाकली कात नुकत्याच शासनाने जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये सीबीएससी पॅटर्न राबवण्याचा निर्णय घेतला आहे यामुळे जे पालक अवाढव्य फीस भरून इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये मुलांना शिकवु शिकत नाही त्यांना जिल्हा परिषदेच्या शाळांना प्राधान्य दिले आहे ही बाब जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी समाधानकारक आहे व आता हळूहळू विद्यार्थ्यांची ओढ देखील वाढू लागली आहे.

गुणवत्तेच्या नावाखाली इंग्रजी माध्यमाच्या शाळा कडून मोठमोठ्या जाहिराती करून पालकांना प्रलोभन दाखवले जाते वर्षभर कुठल्या ना कुठल्या उपक्रमाच्या नावाखाली पालकाकडून शिल्लक उकळले जाते याबाबतच्या अनेक तक्रार जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे आलेल्या आहेत मात्र एकही कारवाई जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग करत नाही ही दुर्दैवी आहे मात्र आत्ता जिल्हा परिषदेच्या शाळेने देखील सीबीएससी पॅटर्न राबवल्यामुळे विद्यार्थ्यांचा व पालकांचा जिल्हा परिषद च्या शाळेकडे कल वाढला आहे हे वास्तव नाकारून चालणार नाही असे शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी सांगितले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT